## प्रकरण दुसरे

## म्यूनिसिपल कमेटी कसबा मुरगूड, जहागीर कागल

## ऐतिहासिक पार्श्वभूमी - सन १९२१ ते १९९०

## प्रकरण दुसरे

### "म्युनिसिपल कमेटी कसबा मुरगूड, जहागीर कागल

### ऐतिहासिक पार्श्वभूमी - सन १९२१ ते १९९०"

"मुरगूड म्युनिसिपल कमेटी दि. १ सप्टेंबर, १९२१ रोजी कै. श्रीमंत सरपिराजीराव घाटगे सरजाराव वजारात मा. आब. जहागीर कागल सिनी. यांच्या आज्ञेनुसार स्थापन करण्यात आली.[१] अलीकडील काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारांची व कार्याची जागृती लोकांच्यामध्ये झालेली होती. त्यामुळे सर्व जातीचे लोक त्यात सहभाग होऊ लागले होते. कोणत्याही सामाजिक कार्यात जाती व व्यक्तीद्वेष न राहता प्रत्येकाला सामाजिक कार्यात सहभागी करून घेण्यासाठी या नगरपालिकेची स्थापना करण्यात आली आहे. या नगरपालिकेची स्थापना करण्याच्या वेळी नगरपालिकेची सीमा पूर्वेकडील बाजूस आनंदाश्रम बंगल्यापर्यंत, दक्षिणेस हरिजन समाजाच्या वस्तीची सीमा धरून, उत्तरेस निपाणी - फोंडाघाट रस्त्याच्या पर्यंत व पश्चिमेस वेदगंगा नदीपर्यंत होती. ही सीमा श्रीमंत सरपिराजीराव बापूसाहेब घाटगे, सरजाराव वजारत, मा.आब. यांच्या दि. ३ जून, १९२१ च्या जाहिरनाम्यानुसार निश्चित करण्यात आली होती.[२]

सन १९२१ च्या जनगणनेनुसार या शहराची लोकसंख्या ३५०० होती.[३] हे शहर कसब्याचे शहर होते. त्या काळापासून येथे दर मंगळवारी तांदळाचा व जनावरांचा मोठा व्यापार भरत आहे. श्रीमंत जाहगीरदारसाहेब यांनी त्या काळात ८ लाख रुपये खर्च करून शहराजवळ पूर्वेस तलाव बांधून पिण्याच्या

पाण्याची सोय करण्यात आलेली होती. या तलावातून ३०० एकर शेती-साठीसुध्दा पाणी वापरले जात असे. शहरात दिवा-बत्तीची सोय म्हणून ठिक-ठिकाणी चाळीस कंदील लावण्यात आलेले होते. जनावरांच्या बाजारात पाणी पिण्यासाठी पाण्याचा हौद बांधण्यात आला होता. शहरात सार्वजनिक सोयीसाठी कांही ठिकाणी ४ सौच कुपींची व्यवस्था करण्यात आली होती. शहरातील सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य ती उपाययोजना केलेली होती. रस्ते व गटारी स्वच्छ राखल्या जात होत्या. [४]

शहरातील लोकांना आरोग्यविषयक सोयी उपलब्ध असाव्यात या दृष्टीने येथे सर्व धर्मियांसाठी "सार्वजनिक धर्मादाय दवाखाना" स्थापन करण्यात आला होता. याच काळात प्लेगच्या रोगाची साथ आली होती. त्यामुळे या दवाखान्यामार्फत शहरातील लोकांची योग्य ती दक्षता घेण्यात येत होती. तसेच सांडपाण्याच्या गटारीत जंतू नाशक औषधे व रस्त्यांची आणि वस्त्यांची स्वच्छता करण्यात येत होती. सार्वजनिक देवालयाजवळ पिण्याच्या पाण्याचा हौद बांधण्यात आला होता. नगरपालिका स्थापने-पूर्वी सार्वजनिक वाचनालय अस्तित्वात नव्हते. सन १९२२ मध्ये "जनरल लायब्ररी मुरगूड" या नावाची नगरपालिकेमार्फत लायब्ररी चालू करण्यात आली होती. [५] या लायब्ररीच्या स्थापनेसाठी नगरपालिकेने ७५/- रुपये देणगी स्वरूपात रक्कम दिली होती. तेथून पुढे प्रत्येक वर्षाला या लायब्ररी-साठी नगरपालिकेकडून ५०/- रुपये देण्याचे ठरविण्यात आले होते.

मुरगूड या शहराच्या आसपास ३० ते ४० लहान लोकसंख्येची खेडी होती. त्या खेडयातील व मुरगूड शहरातील मुलांच्या शिक्षणासाठी नगरपालिकेकडून "अँग्लो-व्हर्न्याक्यूलर स्कूल"ची स्थापना केली होती. [६] त्या काळात या स्कूलमधून प्रतिवर्षी ३५ ते ४० विद्यार्थी शिक्षण घेत होते.

या नगरपालिकेच्या कमिटीमध्ये एकूण १४ सदस्य नियुक्त केले जात होते. या सर्व १४ सदस्यांच्या नियुक्त्या मा.आब. रावसाहेब यांच्या आज्ञेनुसार होत होत्या. मा. आब. रावसाहेब हेच नगरपालिकेचे प्रेसिडेंट म्हणून काम पाहत असत. यातील १४ सदस्यांपैकी ४ सदस्य हे सरकारी नोकर होते. सन १९२१-२२ मध्ये जनरल कमिटीच्या एकूण १२ सभा झाल्या त्यात एकूण ४५ ठराव पास करण्यात आले होते. या कमिटीतील सर्व सदस्य हे पुरुषच नियुक्त केलेले होते. या काळात स्त्रियांना सदस्य म्हणून सामावून घेण्यात येत नव्हते. मात्र पुरुषांनी ठरविलेली कामे स्त्रियांवर बंधनकारक होती. मात्र स्त्रियांना प्रतिनिधीत्व दिले नसल्याने त्या वेळच्या स्त्रीया त्या व्यवस्थेपासून बाजूलाच राहिल्या होत्या. [७]

त्यावेळी नगरपालिकेच्या कामाच्या व्यवस्थापनेसाठी तीन विभाग पाडण्यात आले होते.

१) साधारण व्यवस्था, वसूल व देखरेख विभाग.
२) सफाई विभाग.
३) रस्ते, नाले, इमारती व इतर विभाग.

वसूल व देखरेख विभागामार्फत बाजाराच्या दिवशी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून देखरेख ठेवली जात होती. तसेच जनावरांच्या शिंगोटीचे पैसे वसुल करणे, माल जकातीचे पैसे वसूल करणे अशी कामे केली जात होती. याचा वार्षिक वसूल ५,८००/- रूपये इतका होत होता.

रस्ते, नाले, इमारती या विभागामार्फत गावातील प्रमुख रस्त्यांचे खडीकरण करणे, रस्त्यातील नाल्यावर लहान बंधारा घालणे अशी कामे

केली जात होती. तसेच नविन वसाहतीमध्ये कापड बाजार व मटण मार्केट यासाठी दोन नवीन इमारती बांधण्यात आल्या होत्या. त्यांची देखभाल केली जात होती.

दिवाणी आर फौजदारी खटले चिटणीस किंवा मॅनेजिंग कमिटी ठरविल त्याप्रमाणे चालविले जात होते.

वरील सर्व विभागांचे कामकाज व दप्तर मराठीत असावे असा ठराव कमिटीने केलेला होता. व सर्व हिशोब चिटणीसाकडे लिखित स्वरूपात असावा आणि तीन वर्षापासून अधिक मुदतीपर्यंत शिल्लक राहणारा पैसा खास जमा करावा असे कमिटीने ठरविले होते. हे खास जमा होणारे पैसे सार्वजनिक दवाखाना तसेच "अँग्लो-व्हर्न्याक्यूलर स्कूलला" देणगी स्वरूपात देण्यात येत होते.

सन १९२१ साली नगरपालिका स्थापन झाल्यापासून सन १९५१ पर्यंत मा.आब.जहागीर यांचे नगरपालिकेवर वर्चस्व राहीले होते. परंतु मुंबई सरकारच्या स्थानिक स्वराज्य आणि आरोग्य खात्याकडील दि. १७ सप्टेंबर, १९५१ च्या ठराव क्रमांक ७०२२/३३ नुसार त्यांचे अधिकार काढून घेतले गेले. [८] दि. १७ सप्टेंबर, १९५१ च्या या ठरावानुसार नगरपालिकेची घटना बदलण्यात आली होती. नगरपालिकेच्या एकूण १४ सदस्यांपैकी १ जागा हरिजनांच्यासाठी तर १ जागा स्त्री राखीव करण्यात आली होती. ही स्त्री राखीव जागा ४ प्रभागांमध्ये फिरती ठेवण्यात आली होती. नवीन घटनेवर आधारित असणारी मुरगूड नगरपालिकेची निवडणूक दिनांक ८ मे, १९५२ रोजी झाली होती. [९] निवडून आलेल्या १४ सदस्यांमध्ये स्त्री राखीव सदस्य म्हणून

सौ. शाकुंतलाबाई ज्ञानदेव माळवदे यांचा समावेश होता. मात्र यांच्या उमेदवारीच्या निश्चितीचे कारण म्हणजे त्यांचे पती स्वातंत्र्य सैनिक, सामाजिक कार्यकर्ते व प्रतिष्ठित होते. त्या काळच्या समाजात पुरुषांच्या मताला, विचारांना किंमत होती. तसेच पतीच्या विचाराशिवाय पत्नी कोठेही जाऊ शकत नसे किंवा बोलू शकत नसे. या कारणामुळेच शाकुंतला-बाई ज्ञा. माळवदे या नगरपालिकेत सदस्या म्हणून निवडून येवून सुध्दा सतत ४ महिने जनरल बॉडीच्या बैठकांना हजर राहू शकल्या नाहीत. त्या बैठकांना हजर न राहिल्यामुळे नगरपालिकेच्या नियमानुसार त्यांचे सदस्यत्व रद्द ठरविण्यात आले. म्हणजेच त्या काळात स्त्री स्वातंत्र्याला महत्व असूनही स्त्रियांच्या विचाराला स्वतंत्र असे स्थान नव्हते. त्यामुळे अशा स्त्रिया निवडून आल्या तरी आपले स्वतंत्र अस्तित्व दाखवू शकत नव्हत्या.

थोडक्यात नगरपालिकेमध्ये स्त्रियांच्यासाठी राखीव जागा ठेवूनही स्त्रीया आपल्या व अधिकार व् हक्कापासून वंचीत ठेवल्या जात होत्या हेच यावरुन दिसून येते.

नगरपालिकेच्या दुसऱ्या पंचवार्षिक निवडणूकीनंतर दिनांक १७ जुलै, १९५७ पासून दुसरी जनरल बॉडी अस्तित्वात आली. [१०] त्यानुसार स्त्री राखीव सदस्य म्हणून श्रीमती लिलावती पोपटलाल शाहा या काम करत होत्या. त्यांना मात्र सामाजिक व राजकीय कार्य करण्याची मनापासून इच्छा होती. तसेच पतीकडील वातावरण सुध्दा तिला हे कार्य करण्यास अनुकूल असे होते. म्हणजेच तिच्या उमेदवारी निश्चितीला कुटुंबाचे सहाय्य व तिच्या स्वतःच्या सामाजिक व राजकीय कर्तृत्वाचा हातभार होता. सततच्या सामाजिक कार्यातील पुढकारामुळे नगरपालिकेमध्ये त्यांचा प्रभाव

होता. त्यामुळे दुस-या वर्षी त्यांना "उपनगराध्यक्षपद" बहाल करण्यात आले. स्त्री शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे, स्त्रीला समाजात वेगळे स्थान निर्माण करून देणे, या कामात त्यांचा सतत पुढाकार होता. नगरपालिके-कडून दवाखान्यात स्त्री प्रसूतीसाठी खास सुविधा त्यांनी उपलब्ध करून घेतली होती.

वरील गोष्टीवरून असे दिसून येते की, त्या काळात पुरूषप्रधान संस्कृती असूनही कांही स्त्रिया आपले हक्क व अधिकार बजावत होत्या. वास्तविक स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी व त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी ही स्त्री राखीव जागा अपुरी पडू लागली होती.

स्थानिक स्वराज्य संस्थेत स्त्रियांना कमी प्रमाणात प्रतिनिधीत्वाची संधी मिळते हे शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर शासनाने सन १९६६ मध्ये नगरपालिकेमध्ये स्त्रियांच्या प्रतिनिधीत्वाच्या संख्येत वाढ केली होती. या नुसार नगरपालिकेत स्त्रियांसाठी दोन जागा राखीव ठेवण्यात आल्या होत्या.[११]

सन १९६६ व सन १९७१ च्या नगरपालिकेच्या निवडणुकांचा व कार्याचा विचार करता असे दिसून येते की, सन १९६६ व सन १९७१ च्या निवडणूकीत आलेल्या स्त्रीया सामाजिक व राजकीय कार्याची आवड असणा-या होत्या. परंतु कौटुंबिक वातावरणामुळे व पुरूषप्रधानतेमुळे त्या उल्लेखनीय काम करू शकल्या नाहीत.

नगरपालिकेच्या जनरल सभांना कांही वेळा त्या औपचारीक भाग म्हणून उपस्थित राहत असत.

यानंतरच्या म्हणजेच मुरगूड नगरपालिकेच्या सन १९७७ च्या निवडणूकीत सौ. आनंदीबाई ग. चौगले व सौ. इंदुबाई मा. मांगोरे या दोन स्त्रिया निवडून आल्या होत्या. तसेच त्यांच्या निवडणूकीत त्यांच्या कुटुंबाचा हातभार होता. या दोन्ही स्त्रिया सुशिक्षित होत्या. तसेच त्यांना राजकीय कार्याची जाण होती. त्यामुळे सौ. आनंदी ग. चौगले यांना स्थायी समिती सदस्यत्व देण्यात आले होते. तर सौ. इंदूबाई मा. मांगोरे यांना आरोग्य समितीचे सदस्यत्व दिलेले होते. या समित्याद्वारे नगरपालिकेच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे, शहरातील आरोग्य विषयक सुधारणा करणे अशा कामात या स्त्रिया रस घेत होत्या.

सन १९८५ च्या नगरपालिकेच्या निवडणूकीमध्ये ज्या दोन स्त्रिया निवडून आल्या त्यांना सामाजिक कार्याची तळमळ नव्हती. परंतु त्यांच्या पतींची सामाजिक प्रतिष्ठा त्याला कारणीभूत होती.

कांही वेळा महिला प्रतिनिधींनी निवडून येण्यासाठी पतीच्या प्रतिष्ठेचाही वापर केला जात होता हे यावरून दिसून येते. या दोन महिला प्रतिनिधींपैकी एक महिला प्रतिनिधी सौ. मंगल पांडुरंग खराडे या सतत ५ महिणे नगरपालिकेच्या जनरल सभांना हजर राहिल्याच नव्हत्या. त्यामुळे नगरपालिकेच्या नियमानुसार त्यांचे सदस्यत्व रद्द ठरविण्यात आले.[१२]

परंतु दुसरी स्त्री प्रतिनिधी सौ. हौसाबाई सखाराम डेळेकर या कांही प्रमाणात काम करत होत्या. त्या पाणीपुरवठा समितीच्या व जकात समितीच्या सदस्या म्हणून काम पहात होत्या. या समित्याद्वारे जकात कामावर नियंत्रण ठेवणे,शहरास पाणी पुरवठा व्यवस्थित होतो

की नाही हे पाहणे अशी कामे त्या करीत होत्या.

वरील विवेचनावरून आपणास असे दिसून येते की, अलिकडील स्त्रियांमध्ये आपल्या अधिकाराची जाणीव झालेली होती.

.......

## प्रकरण दुसरे

## संदर्भ सूची


१) मुरगूड म्युनिसिपल कमेटी - स्थापना अहवाल, सन १९२१-२२, पान नं. १.

२) सरजाराव वजारत मा.आब. यांच्या सीमा निश्चितीचा जाहीरनामा, सन १९२१, पान नं. ३.

३) सन १९२१ च्या मुरगूड शहराच्या खानेसुमारीनुसार, पान नं. १७.

४) मुरगूड म्युनिसिपल कमेटिचा सन १९२२-२३ चा कामाचा वार्षिक अहवाल, पान नं. ४.

५) मुरगूड म्युनिसिपल कमेटिच्या कामाचा सन १९२२-२३ चा वार्षिक अहवाल, पान नं. ७.

६) मुरगूड म्युनिसिपल कमेटिच्या सन १९२१ च्या शैक्षणिक ठरावा-नुसार, पान नं. ३.

७) मुरगूड म्युनिसिपल कमेटिच्या सन १९२१-२२ च्या कामकाज अहवालानुसार.

८) मुंबई सरकारच्या स्थानिक स्वराज्य व आरोग्यखात्याकडील सन १९५१ च्या ठरावानुसार.

९) मुंबई सरकारच्या नगरपालिका निवडणूक आदेश सन १९५१ नुसार.

१०) नगरपालिकेचा निवडणूक कायदा सन १९५६.

११) शासनाचा, स्थानिक स्वराज्य संस्थेतील स्त्री राखीव जागा संबंधिचा कायदा, सन १९६६.

१२) नगरपालिकेच्या डीस कॉलीफाब या कायद्यानुसार.

..........